महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. (०२२)२२७९ ३३४७

सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

क्र. एमआयएन-१२१९/प्र.क्र.२१९ /२१ दि.०३.०७.२०१९

प्रति,

सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय,मुंबई.

विषय :- मंत्री आस्थापनेवरील प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबत
लघुलेखक/लिपिक-टंकलेखक/शिपाई

महोदय,

मा. मंत्री/राज्यमंत्री यांच्या कार्यालयीन आस्थापनेवरील सावधी पदांचा आकृतीबंध सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकः एमआयएन १२१४/प्र.क्र.२८८/२१ दिनांक १४.११.२०१४ नुसार तयार करण्यात आला आहे. दि. १६.०६.२०१९ रोजी मंत्रीमंडळाचा विस्तार झाला असून नवनियुक्त मा. मंत्री/राज्यमंत्री यांच्या कार्यालयातील तसेच सध्य:स्थितीतील मा. मंत्री/राज्यमंत्री यांच्या कार्यालयातील सेवानिवृत्तीने रिक्त झालेल्या/ होणा-या लघुलेखक/लिपिक-टंकलेखक/शिपाई या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करावयाची आहे. त्यानुसार मंत्री आस्थापनेवरील लघुलेखक/लिपिक-टंकलेखक/शिपाई या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याकरीता आपल्या विभागातील इच्छुक कर्मचा-यांची खालील माहिती त्वरीत पाठविण्याची आपणास विनंती करण्यात येत आहे.

१) प्रथम नियुक्तीचा दिनांक
२) सध्या धारण केलेले पद, त्या पदाची वेतनश्रेणी
३) मागील पाच वर्षाच्या गोपनिय अहवाल/कार्यमुल्यांकन अहवालाच्या छायांकित प्रती
४) सेवानिवृत्तीचा दिनांक
५) मंत्री कार्यालयात प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्याबाबत संबंधीत कर्मचा-याचे संमतीपत्र.
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०११/प्र. क्र. १३७/कार्यासन-१२, दि. १७.१२.२०१६ अन्वये आपले विभागाचे/कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
७) संबंधीत कर्मचारी यांनी यापूर्वी प्रतिनियुक्तीवर काम केलेल्या कालावधीचा संपूर्ण तपशील

(कृ.मा.प.)

८) संबंधीत कर्मचारी यांनी दि.१४.११.२०१४ पूर्वी मा.मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री/राज्यमंत्री यांचे कार्यालयात खाजगी सचिव, विशेष कार्य अधिकारी व स्वीय सहायक म्हणून काम केले आहे किंवा कसे, असल्यास पदनामासह तपशिल. (शिपाई पदाला लागू नाही)

९) संबंधीत कर्मचारी यांनी मत्ता व दायित्वे वार्षिक विवरणपत्र सादर केले आहे किंवा कसे. (शिपाई पदाला लागू नाही.)

१०) संबंधीत कर्मचारी यांनी परिविक्षाधिन कालावधी समाधानकारक पूर्ण करुन त्यानंतर ५ वर्षे सेवा कालावधी पूर्ण केला आहे किंवा कसे.

११) संबंधीत कर्मचारी यांची नियुक्ती परिविक्षाधीन म्हणून झाली नसल्यास त्यांची नियमित नियुक्तीपासून ७ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे किंवा कसे.

१२) संबंधीत कर्मचारी यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार/लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरणे, फौजदारी प्रकरण, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरु आहे किंवा शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे किंवा कसे.

१३) मागील १० वर्षाच्या कालावधीत झालेल्या शिक्षेचा तपशिल

सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७०४११२७२४०७०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

आपला,

Namdeo Kashinath Mali

Digitally signed by Namdeo Kashinath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d3cbafce2e197ab3683c7133deabfac4ef56ca53d2af01b1b3648a21a985c629, serialNumber=1178e48d2f5be414ade2c612247d3db669147cf3ef4acbe3fc4adba8ff18e1d9, cn=Namdeo Kashinath Mali
Date: 2019.07.04 11:31:20 +05'30'

(ना.का.माळी)

अवर सचिव,सामान्य प्रशासन विभाग